## जाहीरात २०२४

राष्टीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम क्षयरोग नियंत्रण सोसायटी, गोंदिया द्वारे आठ वर्ष पुर्ण झालेले दुचाकी वाहन ११ पॅशन प्रो व ३ मॅस्टो गाडयाचा जाहीर लिलाव जसे आहेत, त्या स्थितीत निविदा पध्दतीने करण्यात येणार आहेत. अर्जाचा नमूना व विस्तृत माहिती जिल्हा परिषद गोंदिया www.zpgondia.gov.in या वेबसाईट वरउपलब्ध आहे.

वाहन विक्रीमध्ये भाग घेवु इच्छिणाया व्यक्तींनी बंद पाकीटामध्ये विहीत नमुन्यातील निवीदा फार्म भरणे आवश्यक आहे व निवीदा फॉर्म नविन प्रशासकिय इमारत ४ था माळा रुम नं.४१ जयस्तंभ चौक, जिल्हा क्षयरोग केंद्र, गोंदिया येथुन घेवुन जावे. फॉर्म सोबत पॅनकार्ड, आधारकार्ड कागदपत्र, झेरॉक्स प्रती सेल्फ अटेस्टेड करुन जोडाव्यात.

निवीदा अर्ज दि. ३०/०९/२०२४ ला सायं.५.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावे.

निविदा मंजुर झाल्यानंतर संबंधीतांना जाहिर लिलांवाची तारीख कळविले जाईल, तदनंतर मंजुर किमतीच्या १०० टक्के भरणा करावा लागेल. त्यानंतर वाहनाचा ताबा दिला जाईल.

वाहनाचा ताबा घेतल्यानंतर वाहनाचे प्रति सर्वस्वी जबाबदार खरेदीदार यांचीच राहील. तसेच सदर वाहन खर्चासह हस्तांतरीत करुन घेण्याची जबाबदारी खरेदीदार यांची राहील.

जाहीर लिलाव तहकुब अगर रदद करण्याचा अथवा इतर कोणताही निर्णय जिल्हा क्षयरोग अधिकारी यांना राखुन ठेवला आहे.

स्वा
जिल्हा क्षयरोग अधिकारी
जिल्हा क्षयरोग केंद गोंदिया

स्वा
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा क्षयरोग केंद्र गोंदिया

Scanned with OKEN Scanner

# जाहीर लिलाव

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम क्षयरोग नियंत्रण सोसायटी, गोंदिया जिल्हा क्षयरोग अधिकारी जिल्हा क्षयरोग केंद गोंदिया यांचा मालकीच्या व ताब्यात असलेल्या शासकिय दुचाकी वाहने निर्लेखीत करावयाची आहे. सदर वाहन वाहनाचा लिलाव जसे आहे तसे या तत्वावर विक्री करणे साठी खाजगी व्यक्ती/संस्था यांचेसाठी खालील अटी व शर्तीवर जाहीर लिलाव करण्यात येत आहे. लिलावाच्या वाहनाचा प्रकार खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वाहन क्रमांक | खरेदीचे वर्ष | वाहनाचा प्रकार | निर्लेखनाचा दिनांक | अंदाजित बाजार मुल्य (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | MH-35 D-517 | 2015 | HERO Maestro | 2024 | |
| २ | MH-35 D-518 | 2016 | HERO Passion Pro | 2024 | |
| ३ | MH-35 D-519 | 2016 | HERO Passion Pro | 2024 | |
| ४ | MH-35 D-520 | 2016 | HERO Passion Pro | 2024 | |
| ५ | MH-35 D-521 | 2016 | HERO Passion Pro | 2024 | |
| ६ | MH-35 D-522 | 2016 | HERO Passion Pro | 2024 | |
| ७ | MH-35 D-523 | 2016 | HERO Passion Pro | 2024 | |
| ८ | MH-35 D-524 | 2016 | HERO Passion Pro | 2024 | |
| ९ | MH-35 D-525 | 2016 | HERO Passion Pro | 2024 | |
| १० | MH-35 D-526 | 2016 | HERO Passion Pro | 2024 | |
| ११ | MH-35 D-527 | 2016 | HERO Maestro | 2024 | |
| १२ | MH-35 D-528 | 2016 | HERO Maestro | 2024 | |
| १३ | MH-35 D-529 | 2016 | HERO Passion Pro | 2024 | |
| १४ | MH-35 D-530 | 2016 | HERO Passion Pro | 2024 | |
| | | | | एकुण किंमत | |

## जाहीर लिलावाच्या सर्वसाधारण अटी व शर्ती

लिलाव करावयाच्य वाहनांच्या तपशील दि.२०/०९/२०२४ ते ३०/०९/२०२४ पावेतो जिल्हा क्षयरोग केंद्र, गोंदियाच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत पहावयास उपलब्ध होतील. तसेच प्रत्यक्षात लिलाव सुरु होण्यापुर्वी अटी व शर्ती वाचुन दाखविण्यात येतील. प्रथम जाहीर बोली बोलण्यात येईल.

१) सदर लिलावासाठी वाहन जसे आहेत, त्याच परिस्थितीत विकण्यात येतील. तसेच बोलणा-या व्यक्तीने वाहन पाहुन लिलावात बोली बोलावी. त्यानंतर कोणतीही तक्रार स्वीकारली जाणार नाही.

२) जाहीर लिलावात बोली बोलावयाची असल्यास त्यांनी जाहीर लिलावात भाग घेणेपुर्वी अनामत शुल्क रु.२०००/- व प्रवेश शुल्क रु.२००/- एक तासआधी लिलावच्या दिवशी

Scanned with OKEN Scanner

दि.   /  /२०२४ रोजी कार्यालयात जमा केल्यानंतर, सदर जमा पावती दाखविल्यानंतर लिलावाचे प्रक्रियेत प्रवेश दिला जाईल.

३) जाहीर बोली लावण्यात येईल, लिलावात जास्तीत जास्त बोलीत येणारी रक्कम यापैकी जो जास्त असेल त्यांना वाहन देण्यात येईल.सर्वाधीक बोली बोलणा-यास लिलाव अधिका-याकडे यशस्वी बोलीच्या २५ टक्के रक्कम (एस.डी.) किवा अनामत  (ई.एम.डी.) वजा जाता संपूर्ण रक्कम रक्कम बोली मंजूर झाल्याबरोबर रोख स्वरुपात ३ दिवसात भरावी लागेल. सदरची रक्कम न भरल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व सदर बोली रदद करण्यात येईल. तसेच वाहनाचा लिलाव पुन्हा करण्यात येईल. लिलावाच्या ठिकाणी हया संदर्भात लिलाव समितीचा निर्णय हा अंतिम राहील. अपयशी बोली धारकाच्या अनामत रक्कम परत करण्यात येतील.

४) लिलाव कायम केल्या बददल बोली दरम्यान कळविण्यात आले पासून १० आत एस.डी. रकमेव्यतिरिक्त त्याने उर्वरीत रकमेचा भरणा धनाकर्पाद्वारे करणे आवश्यक आहे. उर्वरीत रक्कम ठरवून दिलेल्या १० दिवसाचे मुदतीत न भरल्यास २ टक्के व्याज दराने व्याज आकारण्यात येईल ही मुदत देखील १५ दिवसाची राहील. तदनंतर ही उर्वरीत रक्कम न भरल्यास अनामत रक्कम व बोलीची २५ टक्के भरलेली रक्कम जप्त करण्यात येईल व विक्री रदद करण्यात येईल.

५) यशस्वी बोलीदाराकडुन २५ टक्के रकमेचा भरणा केल्यानंतर संपूर्ण रक्कम भरेपर्यंत तसेच प्रत्यक्ष ताबा घेईपर्यंत वाहनाची जबाबदारी बोलीदाराची राहील, त्याचा जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र, गोंदिया हे जबाबदार राहणार नाही.

६) एकदा जाहीर केलेल्या वाहनाचा लिलाव कोणतेही कारण न देता वेळेवर स्थगित करणे, आयत्या वेळेस वाहनाचा अंतर्भाव करण्याचा किवा कमी करण्याचा अधिकार लिलाव समितीने राखुन ठेवला आहे.

७) जाहीर लिलावात दोन वार बोली झालेनंतर जाहीर लिलावामध्ये मंजुरीचा अधिकार जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र, गोंदिया यांनी राखून ठेवला आहे.

८) खरेदीदाराने स्वखर्चाने योग्य किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर खरेदीचा करारनामा करुन घ्यावा लागेल.

९) प्रवेश फी रक्कम रु.२००/- शासन जमा होतील. ती लिलावात बोली बोलणा-यास परत केली जाणार नाही.

१०) मंजुर झालेले वाहन ताब्यात घेण्यास नाकारल्यास बोलीच्या २५ टक्के वाहनाची रक्कम (एस. डी.) परत केली जाणार नाही.

११) यशस्वी बोलीदाराला विकत घेतलेल्या वाहनाचा बोलीच्या संपूर्ण रकमेवर नियमानुसार वस्तु व सेवाकर भरणे आवश्यक राहील, यात कोणतेही सूट मिळण्याचे प्रमाणपत्र लिलाव खरेदीसाठी मिळणार नाही.

१२) संपूर्ण रक्कम भरल्यानंतर वाहन १५ दिवसाचे आत न नेल्यास रु.२००/- प्रतिदिन शुल्क आकारण्यात येतील.

**(डॉ.अभिजीत गोल्हार)**
जिल्हा क्षयरोग अधिकारी
जिल्हा क्षयरोग केंद गोंदिया

Scanned with OKEN Scanner